सं.फौ.के.नं. ३२६/२०२३

नि. क्र. १० लगत

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – प्रशांत सखाराम थुळ, पोलीस पाटील गाव फुणगुस,

**वय** – ४० वर्षे, रा. फुणगुस, थुळवाडी,

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेकडून शपथेवर सुरू –**

०१. दि.१४/११/२०२३ रोजी मी माझ्या दुकानात होतो. त्या दिवशी पोलीसांचा मला फोन आला व फुणगुस भोसलेवाडी येथे दारु पकडलेली आहे सबब तीकडे या असे मला सांगीतले. मी तीकडे गेलो त्यावेळी पोलीसांनी जंगलामध्ये दारु पकडलेली होती. त्या ठिकाणी पोलीस मस्कर आणि दुसरे पोलीस होते. तसेच तेथे कोंडये गावचे पोलीस पाटील देखील होते.

०२. त्या ठिकाणी दारु जप्त करण्यात आली होती. ती कोणाच्या मालकीची होती हे मला माहीती नाही. पोलीसांनी त्या ठिकाणी पंचनामा केला होता व माझी सही देखील घेतली होती. पोलीसांनी त्या ठिकाणी दारु जप्त केली. या व्यतिरिक्त मला माहीती नाही.

(**सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा का.क. १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आणि फौ.प्र.सं.क. १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पध्दतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.**)

०३. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांसांबत प्रोव्ही वॉच करत असताना रोडच्या लगत असलेल्या झाडीझुडपाच्या आडोशाला एक इसम त्याच्या पुढ्यात दोन प्लॅस्टीकचे कॅन आणि पांढ–या मळकट रंगाचे कॅन घेऊन बसलेला मला आढळून आला. हे मला माहीती नाही की, त्या दोन्ही कॅनमध्ये गावठी हातभट्टीची दारु होती.

०४. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष पोलीसांनी तेथे पंचनामा केला. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी त्या ठिकाणी फोटो देखील काढले. साक्षीदाराला आता अभिलेखावर दाखल पंचनाम्याचे दोन फोटो दाखवण्यात आले. या फोटोमध्ये मी दिसून येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, या फोटोमध्ये आरोपी कॅनसोबत खाली बसलेला दिसून येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी त्या कॅनमध्ये दारु होती की नाही हे मला माहीती नाही अशी साक्ष मी देत आहे.

०५. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे तपास टिपण नोंदवलेले होते. साक्षीदाराला त्याच्या टिपणातील रेखांकीत भाग वाचून दाखवण्यात आला. सदरचा मजकुर मी पोलीसांना टिपण देतेवेळी सांगीतलाच नव्हता.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेतर्फे</u> –**

०६. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटील असल्याने पोलीसांना मदत करणे हे माझे कर्तव्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, फुणगुस गावचा पोलीस पाटील असल्याने पोलीसांनी माझे साक्षीदार म्हणून नाव याकामी दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत पंचनामा कोणी केला, कधी केला हे मला व्यक्तीशः सांगता येणार नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पोलीसांनी पंचनामा केला, घटनास्थळी फोटो काढण्यात आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.11.12 17:29:12 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – १२/११/२०२४**

**न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**